# संतांचे साहित्य व कार्य



संपादक

प्रा. प्रवीण घारपुरे

Govt. College of Arts & Science Aurangabad

PRINCIPAL
Govt. College of Arts & Science
Aurangabad

# संतांचे साहित्य व कार्य
# Santanche Sahitya va Karya

● संपादक

**प्रा. प्रवीण मधुकरराव घारपुरे**

● प्रकाशक

आकार प्रकाशन, महाल, नागपूर
मोबा. ९८२२५६५७८२

● © **जीवन विकास महाविद्यालय,**
देवग्राम (थुगांवदेव), ता. नरखेड, जि. नागपूर

● प्रथमावृत्ती

**४ डिसेंबर २०१७**

● मुखपृष्ठ

**सी.डी. शिवणकर**

● अक्षर जुळवणी

**स्कॅन डॉट कॉम्प्युटर**, महाल, नागपूर

● मुद्रण स्थळ

रेनबो ऑफसेट, नागपूर

● ISBN : 978-81-93-5535-4-1

● किंमत : रुपये १५०/-

Govt. College of Arts & Science ★ Aurangabad ★ सत्यमेव जयते

PRINCIPAL
Govt. College of Arts & Science
Aurangabad




Govt. College of Arts & Science * Aurangabad

PRINCIPAL
Govt. College of Arts & Science
Aurangabad

# अनुक्रमणिका

१. संतांचे साहित्य व कार्य — डॉ. गिरीश सपाटे ........................ ९

२. संत चळवळीतील सामाजिकता — डॉ. रेखा वडिखाये ........................ २३

३. संत तुकारामाच्या अभंगातील कालातीतता — प्रा. नेमीचंद चव्हाण ........................ २८

४. कुटुंबकवी : संत ज्ञानेश्वर — प्रा. प्रवीण घारपुरे ........................ ३६

५. संत तुकारामाच्या काव्यातील

६. समाजभिमुखता व तात्विकता — डॉ. अशोक भक्ते ........................ ४३

संत साहित्यातील भाषावैभव — डॉ. जनार्दन काटकर ........................ ५०

७. वारकरी संप्रदायातील सामाजिकता — डॉ. भूषण बंड ........................ ५५

८. संत साहित्याची सांस्कृतिक पार्श्वभूमी — प्रा. सुधाकर भुयार ........................ ६०

९. ज्ञानेश्वरांची अभंगवाणी — डॉ. कोमल ठाकरे ........................ ६४

१०. संत साहित्याची कालातितता — डॉ. विजय राऊत ........................ ६९

११. संत साहित्य आणि संत एकनाथ — डॉ. प्रेमा लेकुरवाळे चोपडे ........................ ७४

१२. श्री संतश्रेष्ठ नामदेवांचे कवित्व — प्रा. एम.डी. झलके ........................ ७८

१३. संतसाहित्यातील काव्यरचना प्रकार आणि काव्यनिर्मितीतील सौंदर्य — डॉ. संगीता खुरद ........................ ८२

१४. वारकरी संप्रदाय आणि संत कवयित्री — डॉ. रेखा शेरकर ........................ ८९

# संत साहित्यातील भाषावैभव

❑ डॉ. जनार्दन काटकर
शासकीय ज्ञान विज्ञान महाविद्यालय, औरंगाबाद

महाराष्ट्र ही संताची आणि वीरांची भूमी म्हणून ओळखली जाते. भारतीय संस्कृतीचे आणि उदात्त जीवनमुल्यांचे अधिष्ठान बहुभाषीय भारतीय साहित्याला लाभले असले तरी भारतातील इतर प्रदेशांपेक्षा महाराषची प्रकृती मूलतः भिन्न आहे. वीरत्व आणि वैराग्य यांच्या परंपरा येथे एकत्र नांदल्या. लावणीबरोबर अभंगदेखील याच मातीत जन्माला आला. रगेलपणाबरोबर येथील रंगेलपणाही अविस्मरणीय ठरला. विविध भावना आणि विचारांचे प्रवाह साहित्यात एकवटलेले आहेत. मराठीची साहित्यगंगा प्रवृत्ती आणि निवृत्तीच्या काठाकाठाने वाहिली. आणि या दोन्ही काठांवरील लोकजीवन तिने समृद्ध केले असे असले तरी मराठी साहित्यातील संतसाहित्य प्रवाह हा विशेष उल्लेखनीय ठरला आहे. सातशे वर्षानंतरही संत साहित्याची गोडी आणि लोकप्रियता तसूभरही कमी झाली नाही उलट कालौघात ती वाढत असल्याचाच प्रत्यय येतो. संतसाहित्याच्या या लोकप्रियतेमागे संत साहित्यातून व्यक्त झालेला विचार जितका मोलाचा आहे तितकीच मोलाची ही विचार व्यक्त करणारी भाषादेखील आहे हे विसरुन चालणार नाही. अठरापगड जातीतील संतांनी लोकभाषेतल्या प्रतिमा वापरुन अध्यात्मिक विचार प्रकट केला म्हणूनच हे साहित्य जनसामान्यांपर्यंत पोहचले. त्याने जनसामान्यांच्या हृदयाचा ठाव घेतला आणि आजही ते साहित्य श्रद्धेने आणि आवडीने वाचले जाते. ज्या भाषेतून संतसाहित्य निर्माण झाले ती भाषा अत्यंत महत्वाची असल्याने त्या भाषावैभवाचा परिचय आपल्याला या संशोधनपर लेखात करुन घ्यावयाचा आहे.

संत ज्ञानेश्वरांनी भागवत धर्माचा पाया घातला आणि ज्ञानेश्वरीसारखा अलौकिक ग्रंथ मराठी भाषेत निर्माण करुन मराठी भाषेचे सामर्थ्य जगाला दाखवून दिले. पुढे संतमेळ्यातील सर्वच कवींनी मराठी भाषेत अभंगनिर्मिती करुन मराठी भाषेचे वैभव वाढवले यादवकालीन समाजाला नवविचारांचे दान करणारे थोर तत्त्वज्ञ म्हणून ज्ञानदेव जितके परिचित आहेत तितकेच, किंबहूना त्याहूनही अधिक ते कवी म्हणून प्रसिद्ध आहेत. त्यांच्या कवित्वाची सारी वैशिष्ट्ये ज्ञानेश्वरीमधून दिसून येतात. ज्ञानेश्वरी हा तत्त्वज्ञानात्मक ग्रंथ म्हणून जितका मोलाचा आहे तितकाच तो काव्यग्रंथ म्हणूनही



भाषा आहे उपमा-दृष्टांत हे ज्ञानेश्वरांच्या काव्याचे खास वैशिष्टये आहे. त्यांच्या भाषासौंदर्याचा परिचय करुन घेण्यासाठी उदाहरणार्थ जेथे श्रीकृष्ण तेथे लक्ष्मी हे सांगताना ज्ञानदेव खालील दृष्टांत देतात -

चंद्र तेथे चंद्रिका। शंभु तेथे अंबिका
संत तेथे विवेका। असणे की जी॥
रावी तेथे कटक। सौजन्य तेथे सोयरीक।
वन्हि तेथे दाहक। सामर्थ्य की॥

असे अत्यंत समर्पक दृष्टांत ज्ञानेश्वरीच्या पानापानावर आढळतात त्यातून ज्ञानदेवांच्या भाषासामर्थ्याचा आणि त्यांच्या साहित्यातील भाषावैभवाचा प्रत्यय येतो.

संतमेळ्यातील महत्वाचे संत म्हणजे संत नामदेव अंतर्मुखता, आत्मपरता आणि जिव्हाळा हे त्यांच्या काव्याचे खास विशेष. त्यांनी आपल्या भावजीवनातील विविध प्रसंग अभंगात वर्णन केलेले असल्याने त्यांच्या अभंगांना एखाद्या भावकवितेचे स्वरुप प्राप्त झाले आहे. त्यांच्या भाषासौंदर्याचा परिचय करुन घेण्यासाठी खालील अभंग पाहण्यासारखा आहे. अनंतत्वाशी झालेली आपली एकरुपता देवांनी खालील अभंगातून समर्थपणे व्यक्त केली आहे.

तूं अवकाश मी भूमिका। तूं लिंग मी साळुंका।
तूं समुद्र मी द्वारका। स्वयें दोन्ही॥
तूं वृंदावन मी चिरी। तूं तुळशी मी मंजरी।
तूं पावा मी मोहरी। स्वयें दोन्ही॥
तूं चांद मी चांदणी। तूं नाग मी पद्मिणी।
तूं कृष्ण मी रुक्मिणी। स्वयें दोन्ही॥
तूं नदी मी थडी। तूं तारुं मी सांगडी।
तूं धनुष्य मी भातोडी। स्वयें दोन्ही॥
तूं वेद मी स्तविता। तूं शास्त्र मी गीता।
तूं गंध मी अक्षदा। स्वयें दोन्ही॥
नामा म्हणे पुरुषोत्तमा। स्वयें जडलों तुझ्या प्रेमा।
मी कुडी तूं आत्मा। स्वयें दोन्ही।

Govt. College of Arts & Science Aurangabad
PRINCIPAL
Govt. College of Arts & Science
Aurangabad

हा एकच अभंग संत नामदेवांच्या भाषावैभवाचा प्रत्यय देण्यास पुरेसा आहे.

संतमेळ्यातील विविध जातींमधील संतांनी आपापल्या व्यवसायातल्या प्रतिमा वापरुन अभंग रचना करुन मराठीच्या भाषावैभवात मोलाची भर घातलेली आहे. संत सावतामाळी यांनी तर आपला सारा व्यवसायच विठ्ठलमय केला आहे. यासंदर्भात त्यांचा खालील

अभंग प्रसिद्ध आहे-

कांदा मुळा भाजी। अवघी विठाबाई माझी॥
लसून मिरची कोथिंबिरी। अवघा झाला माझा हरी॥
मोट नाडा विहीर दोरी। अवघी व्यापिली पंढरी॥
सावंता म्हणे केला मळा। विठ्ठलपायी गोविला गळा॥

संत सावतामाळी यांच्याप्रमाणे संत नरहरी सोनार यांनीही आपला सराफीचा व्यवसाय विठ्ठलमय केला त्यांचा खालील अभंग प्रसिद्ध आहे.

देवा तुझा मी सोनार। तुझे नामाचा व्यवहार।
देह बागेसरी जाणे। अंतरात्मा जाण सोने।
त्रिगुणाची करुनी मूस। आत ओतिला ब्रम्हरस।
जीव शिव करुनि फुंकी। रात्रंदिवस ठोका ठोकी।

अशाप्रकारे आपल्या व्यवसायातील प्रतिमा वापरुन त्यांनी मराठीचे भाषावैभव वाढविले आहे.

संतमेळ्यातील महत्त्वाचे संत गोरा कुंभार यांनीही आपल्या व्यवसायाला अभंगात स्थान दिले आहे. त्यांचा

देवा तुझा मी कुंभार। नासी पापाचे डोंगर।
ऐेशा संतप्त हो जाती। घडे साधूची संगती।
म्हणे कृपा भगवंताची। गोरा कुंभार मागे हेचि॥

हा अभंग प्रसिद्ध आहे. संत चोखामेळा यांनीही अस्पृश्य जातीत जन्माला आल्याचे दु:ख खालील अभंगात व्यक्त केले आहे.नाही देह शुद्ध याति अमंगळ। अवघे ओंगळ गुणदोष॥

करु जाता विचार अवघा अनाचार। आणिक प्रकार काय बोलू॥
वाणी नाही शुद्ध धड न ये वचन। धि:कारिती जन सर्व मज॥
अंगसंग कोणी जवळ न बैसे। चोखा म्हणे ऐसे जीवित माझे॥

संत चोखा मेळा यांच्याप्रमाणे संत कर्ममेळा यांनीही हीच वेदना खालील अभंगातून व्यक्त केली आहे.

आमुची केली हीन याती। तुज का न कळे श्रीपती॥
जन्म गेला उष्टे खाता। लाज न ये तुमचे चित्ता॥
आमचे घरी भात दही। खावोनी कैसा म्हणसी नाही॥
म्हणे चोखियाचा कर्ममेळा। कासया जन्म दिला मला॥

या अभंगांमधून अस्पृश्यतेची वेदना व्यक्त झालेली असली तरी त्यातील शब्दकळेने मराठीचे भाषावैभव निश्चितच वाढविलेले आहे.

संत सेना महाराज यांनीही एका अभंगातून विठ्ठलाचे सुंदर वर्णन केलेले असून यातून त्यांच्या भाषासामर्थ्याचा प्रत्यय येतो. स्वत:स ते विठोबारायाचे दूत म्हणवितात

विटेवरी उभा। जैसा लावण्याचा गाभा॥
पायी ठेऊनिया माथा। अवघी वारली चिंता॥
समाधान चित्ता। डोळा श्रीमुख पहाता॥
बहुजनी केला लाग। सेना देखे पांडुरंग॥

संत एकनाथ हे संतसाहित्यप्रवाहातील महत्त्वाचे संतकवी असून त्यांनी विविध स्वरुपाची विपूल अशी काव्यरचना केलेली आहे. त्यांच्या भाषासौंदर्याचा आणि भाषावैभवाचा परिचय करुन घेण्यासाठी त्यांची खालील गौळण पाहण्यासारखी आहे. खोडकर कृष्णाबद्दल गौळणी यशोदेजवळ तक्रार करतात की

कवाड भ्रांतीचे उघडिले। कुलूप मायेचे मोडिले।
शिंके अविद्येचे तोडिले। बाई तुझिया कृष्णे॥
डेरा फोडिला दंभाचा। त्रिगुण तिवईस ठाव कैचा॥
प्रपंच सडा हा ताकाचा। केला तुझिया कृष्णे॥

भागवत धर्माचा पाया कळसाला चढवणारे आणि पाच हजारांहून अधिक अभंगरचना करणारे जगद्गुरु तुकोबाराय तर भाषाप्रभूच होते. त्यांच्या अभंगावरच मराठी भाषा पोसली गेली आहे. त्यांची अभंगवाणी आजही लोकांच्या अंत:करणात घर करुन आहे. त्यांनीही आपल्या भावजीनातील अनेक प्रसंग अभंगात चित्रित केलेले आहेत. त्यांच्या भाषासौंदर्य आणि भाषावैभवाच्या संदर्भात खालील अभंग पाहण्यासारखा आहे. आपल्या मनातील आर्तता आणि विठ्ठलासाठीची तडफड या अभंगातून व्यक्त झालेली आहे तो अभंग असा-

कन्या सासुरासी जाये। मागे परतोनी पाहे॥
तैसे झाले माझ्या जीवा। कधी भेटसी केशवा॥
चुकलिया माये। बाळ वेळोवेळा पाहे ॥
तुका तैसा तळमळी। जळावेगळी मासोळी॥

संत साहित्याच्या प्रवाहात संतांप्रमाणे काही संतकवयित्रीही होऊन गेल्या त्यांनीही अभंगरचना करुन मराठीच्या भाषावैभवात मोलाची भर घातली आहे. त्यांच्यामध्ये संत मुक्ताबाई हया एक महत्त्वाच्या कवयित्री आहेत. त्यांनी अनेक अभंग रचले त्यांचा खालील अभंग विशेष लोकप्रिय झाला तो असा -

मुंगी उडाली आकाशी। तिने गिळिले सूर्याशी।

Govt. College of Arts
Aurangabad
PRINCIPAL
Govt. College of Arts & Science

थोर नवलाव झाला। वांझे पुत्र प्रसवला।
विंचू पाताळाशी जाय। शेष माथा वंदी पाय।
माशी व्याली घार झाली। देखोन मुक्ताई हासली॥

कूटरचनापर असलेल्या या अभंगातून मुक्ताबाईंच्या भाषावैभवाचा प्रत्यय येतो.

'संतवाटिकेतील जाईची वेल' असे वर्णन केलेल्या संत जनाबाईंनीही अनेक अभंग रचले आहेत. संत ज्ञानेश्वरांबद्दलचा हा अभंग त्यांच्या भाषावैभवाच्या संदर्भात पाहण्यासारखा आहे-

ज्ञानाबाई आई आर्त तुझे पायी।
धावुनिया येई दुडदुडा।
बहु कासाविस झाला माझा जीव।
कळवळ्याची कीव येऊ द्यावी॥

संत तुकारामकालीन संत कवयित्री संत बहिणाबाई यांनीही मौलिक अभंगांची रचना करुन मराठी भाषेच्या वैभवात मोलाची भर घातली आहे. भागवत संप्रदायाचा इतिहास बहिणाबाईनी एका अभंगात वर्णन केलेला आहे त्यांचा तो प्रसिद्ध अभंग असून त्याच अभंगाने प्रस्तुत लेखाचा समारोप करणे संयुक्तिक ठरेल तो अभंग असा-

संतकृपा झाली। ईमारत फळा आली॥
ज्ञानदेवे रचिला पाया। उभारिले देवालया॥
नामा तयाचा किंकर। तेणे रचिले आवार ॥
जनार्दन येकनाथ। खांब दिल्हा भागवत ॥
तुका झालासे कळस। भजन करा सावकाश॥
बहेणि फडकती ध्वजा। निरोपण केले वोजा॥

**संदर्भ ग्रंथ :**

१. र.रा. गोसावी, सकलसंतगाथा
२. सार्थ ज्ञानेश्वरी

☆ ☆ ☆

Govt. College of Arts & Science ★ Aurangabad ★ सत्यमेव जयते
PRINCIPAL
Govt. College of Arts & Science
Aurangabad